कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक ३०/०८/२०१७

दिनांक २९/०८/२०१७ रोजी मिळालेल्या गुप्त बातमिदाच्या खबरेवरुन मा. पोलीस अधिक्षक सो. व मा. अपर पोलीस अधिक्षक यांच्या आदेशान्वये तसेच मा. पोलीस निरीक्षक स्थागुशा गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मौजा आरमोरी येथील आरोपी नामे १) विष्णू तक्तानी, रा. कुरखेडा हा त्याचे वाहनामध्ये देशी दारुचा अवैध माल भरून पुरवठा करणेकामी आरोपी क्रमांक २) धम्मापाल देवटे (वाहण चालकाव्दारे) रा. कडोली व आरोपी क्र. ३) दिपक कैलास मानकर, रा. कडोली (वाहणातील माल उतरविणारा मजूर) याच्या ताब्यात सदर दारुचा माल रांगी येथे पुरवठा पोहचविणेकामी वाहन व देशी दारुचा अवैध माल देऊन देलनवाडी-मानापूर-पिसेवळधा मार्गे रांगी या ठिकाणी आरोपी क्रमांक ४) प्रशांत येळावार, रा. गडचिरोली यांना दारुचा मालाचा पुरवठा करण्याकरीता संगणमताने वाहतूक करीत असताना मिळालेल्या खात्रीशिर खबरेवरुन स्थागुशा गडचिरोली येथील दारुबंदी पथकाने मौजा पिसेवळधा मार्गावर पाठलाग करुन दिनांक ३०/०८/२०१७ ला रात्री ०१.०० ते ०२.०० वा. च्या सुमारास सदर वाहनास पकडून आरोपीताच्या वाहनाची अवैध दारु संदर्भात झडती घेतली असता त्यांचे ताब्यातील मारुती सुझुकी कंपनीच्या रिट्स या चारचाकी वाहनामध्ये २,९४०००/- रु. किंमतीचा अवैध देशी दारुचा माल व ४,०००००/- रु. किंमतीचे चारचाकी वाहन जप्त केले. असा एकूण ६,९४,०००/- किंमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने नमुद चारही आरोपी विरुध्द पोस्टे आरमोरी येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (अ), ९८ (क), ८३ (अ) अन्वये दिनांक ३०/०८/२०१७ रोजी पहाटेच गुन्हा नोंद केला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोस्टे आरमोरी येथे चालु आहे.

सदरची कारवाई मपोउपनि. समु रामकिशोर चौधरी, पोहवा/१४६१ नरेश सहारे, पोना/२२५२ उध्दव नरोटे, पोना/३०९२ दुधराम चवारे, मपोशि/४१५२ दुर्गा साखरे, चानापोशि/२९८६ प्रशांत पातकमवार यांनी केली आहे.

